देश-विदेश

## येशू ख्रिस्ताच्या १०० फूट उंच पुतळ्यावर पडली वीज

**नवी दिल्ली, दि. १९ (वृत्तसंस्था) :** सोशल मीडियावर अनेकदा अनेक प्रकारचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल होत असतात. नैसर्गिक आपत्ती असो किंवा इतर गोष्टी असोत अनेक व्हिडिओ व्हायरल होतात. मात्र आता एक व्हिडिओ समोर आला आहे तो व्हिडिओ ब्राझिलचा आहे. येशू ख्रिस्ताच्या १०० फुटी पुतळ्यावर वीज पडल्याचा हा व्हिडिओ आहे. ब्राझिलमधला हा येशू ख्रिस्ताचा पुतळा जगातला तिसरा सर्वात उंच पुतळा आहे. अशात या पुतळ्यावर वीज पडतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. ही घटना शुक्रवारची आहे. ब्राझिलच्या रियो डी जनेरियोमध्ये येशू ख्रिस्तांचा भव्य पुतळा आहे. या पुतळ्यावर वीज पडतानाचा व्हिडिओ आणि त्यासंबंधीचे फोटो व्हायरल झाले आहेत. ही वीज येशू ख्रिस्ताच्या पुतळ्याच्या डोक्यावर पडली होती. हा व्हिडिओ आणि फोटो पाहून सोशल मीडियावर अनेक लोकांचा काळजाचा ठोका चुकला होता. सोशल मीडियावर या फोटो आणि व्हिडिओचीच चर्चा सुरू होती. इंटरनेटवर हे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर काही लोक चर्चा करू लागले. कुणी असं म्हटलं आहे की ही ईश्वरीय शक्ती आहे. काही जण हे अद्भुत आहे असंही म्हणत आहेत. ब्राझिलमध्ये या पुतळ्यावर वीज कोसळण्याची घटना वर्षातून पाच ते सहावेळा तरी घडते. यामुळे या पुतळ्याचं बरंच नुकसानही झालं आहे. २०१४ मध्येही येशू ख्रिस्ताच्या या भव्य पुतळ्यावर वीज पडली होती. त्यानंतर या पुतळ्याची दुरुस्ती करावी लागली होती. त्यावेळीही या पुतळ्याचे फोटो व्हायरल झाले होते. आता जे फोटो समोर येत आहेत त्यात येशू ख्रिस्ताच्या पुतळ्याच्या डोक्यावर वीज पडताना दिसते आहे. १० फेब्रुवारी २०२३ ला संध्याकाळी ७ वाजता ही घटना घडली आहे. या घटनेचा व्हिडिओ आणि फोटो व्हायरल होत आहेत.

## जॉर्ज सोरोस पूर्वग्रहदूषित आणि धोकादायक! परराष्ट्रमंत्री जयशंकर यांची टीका

**नवी दिल्ली, दि. १९ (वृत्तसंस्था) :** अब्जाधीश उद्योजक जॉर्ज सोरोस हे वृद्ध, श्रीमंत, पूर्वग्रहदूषित आणि धोकादायक आहेत, अशी टीका परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी केली आहे. सोरोस हे जनमानसाला वळण देण्यासाठी गुंतवणूक करतात, असा आरोपही जयशंकर यांनी केला.अदानी समूहाला बसलेल्या धक्क्यांमुळे भारतामध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार कमकुवत होईल, असे विधान सोरोस यांनी गुरुवारी एका कार्यक्रमात केले होते. त्यानंतर भाजपने त्यांच्याविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. परराष्ट्रमंत्र्यांनीही शुक्रवारी सोरोस यांना उत्तर दिले. जयशंकर यांनी ऑस्ट्रेलियातील सिडनीमध्ये रायसीना डायलॉगसोबत झालेल्या बैठकीमध्ये सोरोस यांच्यावर टीका केली. 'सोरोस ही न्यूयॉर्कमध्ये बसलेली वृद्ध, श्रीमंत, पूर्वग्रहदूषित व्यक्ती आहे. ते केवळ वृद्ध, श्रीमंत, पूर्वग्रहदूषित असते तर त्यांच्याकडे दुर्लक्ष करता आले असते, पण ते धोकादायकदेखील आहेत. आपल्या मताप्रमाणे संपूर्ण जगाचे काम चालावे असे त्यांना वाटते,' असा हल्ला जयशंकर यांनी केला. काही वर्षांपूर्वी म्युनिक सुरक्षा परिषदेमध्ये सोरोस यांनी सुधारित नागरिकत्व कायद्याविरोधात (सीएए) भाष्य केले होते याची आठवणही जयशंकर यांनी करून दिली.

## इस्त्रायलची सीरियावर एअरस्ट्राइक, १५ ठार: प्रथमच नागरी वस्तीवर क्षेपणास्त्र हल्ला

**नवी दिल्ली, दि. १९ (वृत्तसंस्था) :** इस्त्रायलने रविवारी सकाळी सीरियाची राजधानी दमास्कसवर क्षेपणास्त्र हल्ला केला. सीरियन ऑब्झर्व्हेटरी फॉर ह्युमन राइट्सच्या माहितीनुसार, एका इमारतिवर झालेल्या या हल्ल्यात १५ जण ठार झाले. हा हल्ला काफर सोउसे भागात झाला आहे. याच ठिकाणी सीरियाची सेक्युरिटी एजंसी, गुप्तहेर मुख्यालय व उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची घरे आहेत. सीरियाच्या संरक्षण मंत्रालयाने एका निवेदनात सांगितले की, इस्त्रायलने दमास्कसच्या गोलान हाइट्स व त्याच्या आसपासच्या भागांतील निवासी क्षेत्रांसह अन्य काही भागांवर हवाई हल्ले केले. यापूर्वीही इस्त्रायलने दमास्कसच्या आसपासच्या भागांवर हवाई हल्ले केले. पण यावेळी प्रथमच त्यांनी निवासी भागाला लक्ष्य केले. हल्ला सीरियन अँटी-एअरक्राफ्ट मिसाईलद्वारे करण्यात आला. नियमानुसार, इस्त्रायली सैन्य सीरियातील हल्ल्यांवर भाष्य करत नाही. पण गत १० वर्षांत इस्त्रायलने सीरियामध्ये पाय रोवण्याच्या प्रयत्नात असलेल्या इराण पुरस्कृत गटांवर अनेक हवाई हल्ले केले आहेत. इस्त्रायलच्या संरक्षण दलाच्या माहितीनुसार, ते प्रामुख्याने अतिरेकी संघटनांच्या शस्त्रसाठ्यावर हल्ला करतात. यात लेबनॉनच्या हिजबुल्लाह या दहशतवादी संघटनेच्या प्रामुख्याने समावेश आहे. इस्त्रायलच्या हवाई हल्ल्यांद्वारे अनेकदा सीरियाच्या हवाई-संरक्षण यंत्रणेला लक्ष्य केले आहे. इस्त्रायलला आपल्या उत्तर सीमेवर इराणी घुसखोरीची भीती वाटते. त्यामुळे ते इराणी तळांवर व लेबनीज दहशतवादी संघटना हिजबुल्लाच्या तळांवर असे हल्ले करते. गतवर्षी ऑगस्टमध्ये इस्त्रायलने सीरियातील २ विमानतळांवर हल्ले केले होते. त्यात ६ सीरियन सैनिकांसह २ परदेशी सैनिक मारले गेले होते. इस्त्रायलने ऊ-४ मिलिटरी एअरबेसवर क्षेपणास्त्र हल्ला केला होता. हिजबुल्लाहचा अर्थ ईश्वराचे दल असा होतो. हिजबुल्लाह लेबनॉनच्या शिया मुस्लिमांची अतिरेकी संघटना व राजकीय पक्ष आहे. ही संघटना इराणच्या शिया मुस्लिमांच्या सिद्धांतावर चालते. १९८२ मध्ये इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड्सनी लेबनॉनमध्ये घुसखोरी केलेल्या इस्त्रायलची नागरिकांना ठार मारण्यासाठी या संघटनेची स्थापना केली होती. हिजबुल्लाहला इराण व सीरियाची राजकीय, सैद्धांतिक व लष्करी ताकद मिळते. यामुळे इस्त्रायल या संघटेचा तिरस्कार करतो.

## पुस्तक सोडून हाती शस्त्र घेणारी युक्रेनच्या शिक्षिकेची कहाणी: रशियाला कीवमधून हाकलले, १५० पुरुष सैनिकांत एकटीच लढली

**नवी दिल्ली, दि. १९ (वृत्तसंस्था) :** बरोबर एक वर्षांपूर्वी युलिया नावाची महिला युक्रेनची राजधानी कीवमध्ये शिक्षिका म्हणून काम करत होती. तिचा संपूर्ण दिवस मुलांच्या अभ्यासाच्या नियोजनात जात असे. अशातच एकेदिवशी रशियाने युक्रेनवर क्षेपणास्त्र डागून युद्धाला प्रारंभ केला. त्या दिवसांपासून युक्रेनमधील लोकांचे आयुष्य बदलले. यात युलिया या शिक्षिकेचे आयुष्य देखील बदलले. रशिया हल्ल्यांच्या भीतीने घरी बसण्याऐवजी युलियाने त्याचा सामना करण्याचा निर्णय घेतला. कोणतेही लष्करी प्रशिक्षण आणि अनुभव न घेता त्यांनी युक्रेनच्या बाजूने लढण्याचा निर्णय घेतला. २३ फेब्रुवारीला त्या व्हॉलेंटरी स्वंयसेवकांच्या तुकडीत सामील झाल्या. ही तुकडी रणांगणात रशियाला तोंड देण्यासाठी सज्ज झाली होती. २४ फेब्रुवारी रोजी, तुकडीत सहभागी झाल्याच्या दुसऱ्या दिवशी, युलिया दुसऱ्या महायुद्धानंतर झालेल्या युरोपमधील सर्वात मोठ्या युद्धात सहभागी झाली होती.रशिया युक्रेनची राजधानी कीववर सातत्याने हल्ले करत होते. दरम्यान, युलिया तेथे बांधलेल्या भुयारी मार्गाची मदत घेत फिटनेस टेस्ट देण्यासाठी पोहोचली. ती फिटनेस टेस्ट उत्तीर्ण होईल की नाही, हे देखील तिला माहित नव्हते. पण जेव्हा युलिया चाचणीसाठी पोहोचली तेव्हा तिथे आधीच उपस्थित असलेल्या स्वयंसेवकांच्या गर्दीत तिला पाहताच एकाने प्रश्न विचारण्यात आला नाही. त्यांच्या हातात एक १२० गोळ्यांची रायफल होती. युलिया त्या लोकांपैकी एक बनली, ज्यांच्यामुळे आज युक्रेनचे सैन्य २ लाख ६० हजारांवरून १० लाख सैनिकांचे झाले आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत युलियाने सुरुवातीचे दिवसांची आठवण सांगितली. जेव्हा ती युद्धामुळे तणावाखाली होती. युलियाने सांगितले की, तिने युद्धापूर्वी कधीही गोळीबाराचा आवाज ऐकला नव्हता.

# २ वर्षांत येणार १२०० विमाने

### एअर इंडिया नंतर अन्य कंपन्याही खरेदीच्या तयारीत



**मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) :** एअर इंडिया कंपनीने आपल्या ताफ्यात नवीन ४७० विमाने खरेदी करत दाखल करण्याची घोषणा केल्यानंतर आता देशात कार्यरत अन्य विमान कंपन्यांनीही नव्या विमानांच्या खरेदीची तयारी सुरू केल्याचे वृत्त आहे. या कंपन्यांच्या नियोजनानुसार जर ही विमान खरेदी झाली तर आगामी दोन वर्षांत देशातील विमान कंपन्यांच्या ताफ्यात नवीन १२०० विमाने दाखल होतील. विमान क्षेत्राशी निगडित 'सेंटर फॉर एशिया पॅसिफिक एव्हिएशन इंडिया' (सीएपीए) या अग्रगण्य संस्थेने नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला असून या अहवालाद्वारे भारतातील विमान कंपन्यांच्या नव्या विमान खरेदीविषयी टिपणी करण्यात आली आहे. एअर इंडियाने नव्या ४७० विमानांच्या खरेदीची प्रक्रिया सुरू केली असून, यापैकी २२० विमाने एअर इंडिया कंपनी बोईंग कंपनीकडून खरेदी करणार आहे तर २५० विमाने ही एअरबस कंपनीकडून खरेदी करण्यात येणार असल्याचे समजते.

इंडिगो विमान कंपनीनेही नव्या विमानांच्या खरेदीची चाचपणी केल्याचे वृत्त आहे. कोरोना महामारीपूर्वी कंपनीने ३०० नव्या विमानांच्या खरेदीचा विचार सुरू केला होता. मात्र, महामारीच्या संकटामुळे हा विचार त्यावेळी स्थगित करण्यात आला होता. मात्र, आता महामारीचे संकट आटोक्यात आल्यानंतर कंपनी पुन्हा एकदा नव्या विमानांच्या खरेदीचा विचार करत असल्याचे समजते. तसेच, केवळ ३०० नव्हे तर इंडिगो कंपनीतर्फे नव्या ५०० विमानांची खरेदी होऊ शकते, अशी चर्चा विमान उद्योगात आहे. विमानांच्या निर्मितीमध्ये जगात अग्रेसर असलेल्या बोईंग आणि एअरबस या दोन्ही कंपन्यांतर्फे १२ हजार ६६९ विमानांची निर्मिती रखडल्याचे वृत्त आहे. विमानाच्या इंजिनसाठी आवश्यक सुट्या भागांची चणचण असल्यामुळे विमानांची निर्मिती रखडल्याचे समजते.

## तिसऱ्या तिमाहीत बँक ऑफ महाराष्ट्रची सर्वोत्तम कामगिरी

**नवी दिल्ली, दि. १९ (वृत्तसंस्था) :** सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या प्रकाशित करण्यात आलेल्या तिमाही आकडेवारी नुसार डिसेंबर २०२२ मध्ये समाप्त झालेल्या तिसऱ्या तिमाहीत पुणे स्थित मुख्यालय बँक ऑफ महाराष्ट्रने एकूण कर्ज व्यवहारात अव्वल क्रमांक प्राप्त केला आहे. पुणे स्थित बँक ऑफ महाराष्ट्रने वार्षिक आधारावर २१.६७ टक्के वाढ नोंदवली आहे

कोव्हीड १९ सारख्या प्रतिकूल परिस्थितीत देखील गेल्या १० तिमाहीमध्ये बँकेने पत पुरवठ्यात अव्वल क्रमांक कायम राखला आहे. कर्ज वाढीत बँक ऑफ महाराष्ट्र प्रथम तर १९.८० टक्के वाढ नोंदवून युनियन बँक ऑफ इंडियाने दुसरा क्रमांक पटकावला आहे आणी त्यानंतर १६.९१ टक्के वाढ नोंदवून देशातील सर्वात मोठ्या भारतीय स्टेट बँकेने चौथा क्रमांक प्राप्त केला आहे. मात्र प्रत्यक्ष आकडेवारीचा विचार करता भारतीय स्टेट बँकेचा एकूण कर्ज व्यवहार रु २६,४७,२०५ कोटी असून तो बँक ऑफ महाराष्ट्रच्या रु १५६९६२ कोटी रुपयांच्या तुलनेत सुमारे १७ पट अधिक आहे. रिटेल, कृषी व सूक्ष्म – लघु – मध्यम उद्योगांना दिलेल्या कर्जात देखील वार्षिक आधारावर १९.१८ टक्के वाढ नोंदवून बँक ऑफ महाराष्ट्राने अव्वल तर १९.०७ टक्के वाढ नोंदवून पंजाब सिंध बँकेने दुसरा व १८.८५ टक्के वाढ नोंदवून बँक ऑफ बडोदाने तिसरा क्रमांक पटकावला आहे. सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील बँकांच्या प्रकाशित झालेल्या तिसऱ्या आकडेवारीनुसार बँक ऑफ महाराष्ट्र व भारतीय स्टेट बँकेची अनुत्पादक कर्जाचे प्रमाण गेल्या तिमाहीत सर्वात कमी होते.

दिनांक ३१ डिसेंबर २०२२ रोजी बँक ऑफ महाराष्ट्र व भारतीय स्टेट बँकमध्ये एकूण कर्जापैकी अनुत्पादक कर्जाचे प्रमाण अनुक्रमे २.९४ टक्के व ३.१४ टक्के आहे. तर निव्वळ अनुत्पादक कर्जाचे प्रमाण अनुक्रमे ०.४७ टक्के व ०.७७ टक्के आहे. दिनांक ३१ डिसेंबर २०२२ रोजीच्या स्थिती नुसार सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये बँक ऑफ महाराष्ट्राचे भांडवली पर्याप्तता प्रमाण सर्वात जास्त म्हणजे १७.५३ टक्के असून कॅनरा बँकेने १६.७२ टक्के व इंडियन बँकेने १५.७४ टक्के भांडवल पर्याप्तता प्रमाण साध्य करून अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे. सदर माहितीनुसार, बँक ऑफ बडोदाने ठेवींमध्ये १४.५० टक्के वाढ नोंदवून अव्वल क्रमांक पटकावला आहे तर युनियन बँक ऑफ इंडियाने १३.४८ टक्के वाढ नोंदवून दुसरा क्रमांक प्राप्त केला आहे. सदर कालावधीतील ठेवितील वाढीमध्ये बँक ऑफ महाराष्ट्रने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये तिसरा क्रमांक प्राप्त केला. एकूण व्यवसाय वाढीचा विचार करता, याच कालावधीत १६.०७ टक्के वाढ नोंदवून युनियन बँक ऑफ इंडियाने अव्वल क्रमांक पटकावला आहे. त्यानंतर बँक ऑफ महाराष्ट्रने १५.७७ टक्के वाढ नोंदवली आहे. एकूण व्यवसाय वाढीत १५.२३ टक्के वाढ नोंदवून बँक ऑफ बडोदाने तिसरा क्रमांक पटकावला आहे.

दिनांक ३१ डिसेंबर २०२२ रोजी समाप्त तिसऱ्या तिमाहीच्या प्रकाशित आकडेवारी नुसार सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी आपल्या नफ्यात ६५ टक्के घसघशीत वाढ केली असून रु २९१७५ कोटी रुपयांचा नफा नोंदविला आहे. नफ्यामधील वाढीचा टक्केवारीच्या अंगाने विचार केल्यास बँक ऑफ महाराष्ट्रने अव्वल क्रमांक प्राप्त केला आहे. डिसेंबर २०२२ रोजी समाप्त तिसऱ्या तिमाहीच्या दरम्यान प्रकाशित तिमाही आकडेवारी नुसार बँकेने आपली नफ्यात १३९ टक्के वाढ नोंदवून रु ७७५ कोटी नफा प्राप्त केला आहे. त्यानंतर कोलकाता येथे मुख्यालय असलेल्या युको बँकेने आपल्या नफ्यात ११० टक्के वाढ नोंदवून रु ६५३ कोटी नफा प्राप्त करून दुसरा क्रमांक पटकावला आहे.

## ६२ टक्के भारतीय कंपन्यांचा अधिकाधिक नवोदितांची नियुक्ती करण्याकडे कल: टीमलीज एडटेक

**मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) :** ६२ टक्के भारतीय कंपन्यांचा अधिकाधिक नवोदितांची (फ्रेशर्स) नियुक्ती करण्याकडे कल असून फ्रेशर्सना नियुक्त करण्याचा सर्वात प्रबळ मानस असलेले अव्वल तीन उद्योग इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी (६७टक्के), ईकॉमर्स अँण्ड टेक्नोलॉजी स्टार्ट-अप्स (५२ टक्के) आणि टेलिकम्युनिकेशम्यु (५१ टक्के) आहेत. हा खुलासा टीमलीज एडटेक या भारतातील अग्रगण्य अध्ययन सोल्यूशन्स प्रदाता कंपनीने नुकतेच जानेवारी ते जून २०२३ सहामाहीसाठी लॉन्च केलेल्या करिअर आऊटलुक रिपोर्टमधून झाला आहे.

TeamLease™ EDTECH Making India Employable

भारतीय रोजगार बाजारपेठेतील काही महत्त्वाचे ट्रेंड्स सादर करण्यात आले आहेत. यात प्रथम श्रेणीच्या शहरांमध्ये बंगळुरू ७५ टक्क्यांसह फ्रेशर्सकरिता अधिक नियुक्त करण्यासंदर्भात अव्वलस्थानी आहे, ज्यानंतर मुंबई (५६ टक्के) आणि दिल्ली (४७ टक्के) या शहरांचा क्रमांक असल्याचे निदर्शनास आले आहे. डेव्हओप्स, सप्लाय चेन मॅनेजमेंट, डेटा इंजिनिअरिंग, बिझनेस व कॉर्पोरेट लॉ मधील पदवी आणि प्रमाणन हे संभाव्य नियोक्त्यांद्वारे मागणी करण्यात आलेले काही इन-डिमांड कोर्सेस आहेत. जागतिक मंदी असताना देखील भारतीय नियोक्तांसाठी फ्रेशर्सना नियुक्त करण्याचा मानस जुलै ते डिसेंबर २०२२ (५९ टक्के) च्या तुलनेत ३ टक्क्यांनी (६२ टक्के) काहीशा प्रमाणात वाढला आहे.

भारतभरातील ६२ टक्के नियोक्तांचा जानेवारी ते जून २०२३ दरम्यान फ्रेशर्सना नियुक्त करण्याचा मानस आहे. क्लाऊड डेव्हलपर, इन्व्हेस्टमेंट बँकिंग असोसिएट, सायबरसिक्युरिटी इंजीनिअर, मार्केटिंग ॲनालिस्ट, सोशल मीडिया स्पेशालिस्ट, कन्टेन्ट राइटर, कॅम्पेन असोसिएट, मायक्रोबायोलॉजिस्ट आणि बायोमेडिकल इंजीनिअर फ्रेशर्सना नियुक्त करण्यामध्ये अव्वल पदे म्हणून उदयास आली आहेत. डेव्हओप्स, कॉर्पोरेट फायनान्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि प्रोजेक्ट मॅनेजमेंट ही उच्च मागणी असलेली डोमेन कौशल्ये आहेत.

# अदानी जगातील श्रीमंतांच्या यादीत घसरले



**नवी दिल्ली, दि. १९ (वृत्तसंस्था) :** अदानी समूहाच्या शेअर्समध्ये सातत्याने घसरण सुरू आहे. २४ जानेवारी रोजी हिंडेनबर्ग रिसर्चच्या अहवालानंतर अदानी समूहाच्या शेअर्समध्ये घसरण होत आहे. हा अहवाल आल्यानंतर एका महिन्यापेक्षा कमी कालावधीत अदानी समूहाचे मार्केट कॅप $१२० अब्जाने कमी झाले आहे. ब्लूमबर्ग अब्जाधीश निर्देशांकानुसार, अदानीची एकूण संपत्ती $१.१५ अब्जावरून घसरून ती $४९.१ अब्ज झाली आहे. जगातील श्रीमंतांच्या यादीत अदानी आता २५व्या क्रमांकावर घसरले आहे. या वर्षी त्यांची एकूण संपत्ती $७१.५ अब्जने घसरली आहे. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये, ते या यादीत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचले आणि त्याची एकूण संपत्ती $१५० अब्जच्या जवळपास पोहोचली होती. फ्रेंच उद्योगपती बर्नार्ड अरनॉल्ट $१९२ अब्ज संपत्तीसह जगातील श्रीमंतांच्या यादीत पहिल्या क्रमांकावर आहेत. एलन मस्क, टेस्ला, स्पेसएक्स आणि ट्विटरचे मालक, १८७ अब्ज डॉलर्सच्या संपत्तीसह यादीत दुसऱ्या स्थानावर आहेत. ॲमेझॉनचे जेफ बेझोस ($१२१ अब्ज) तिसऱ्या, मायक्रोसॉफ्टचे संस्थापक बिल गेट्स ($११७ अब्ज) चौथ्या क्रमांकावर आहेत.

एकेकाळी गौतम अदानी जगातील श्रीमंतांच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर असायचे. अमेरिकन रिसर्च फर्मच्या अहवालानंतर ते या यादीतील टॉप २० मधूनही बाहेर पडले. अदानी समूहाच्या शेअर्समध्ये अजूनही घसरण पाहायला मिळत आहे. अशा परिस्थितीत गौतम अदानी जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत २१ व्या क्रमांकाच्या खाली घसरले आहेत. सध्या ते श्रीमंतांच्या यादीत २५ व्या क्रमांकावर आहेत. गौतम अदानी श्रीमंतांच्या यादीत सतत खाली सरकत आहेत. असेच सुरू राहिल्यास ते २६व्या क्रमांकावरही पोहोचू शकतात.

सध्या, श्रीमंतांच्या यादीत पहिल्या १० मध्ये, अनुभवी गुंतवणूकदार वॉरेन बफे ($ १०७ अब्ज) पाचव्या, लॅरी एलिसन ($ १०२ अब्ज) सहाव्या, स्टीव्ह बाल्मर ($ ९२.१ अब्ज) सातव्या, लॅरी पेज ($ ८८.६ अब्ज) आठव्या, कार्लोस स्लिम ($ ८४.९ अब्ज) अब्ज डॉलर) नवव्या आणि सर्जी ब्रिन ($ ८४.८ अब्ज) दहाव्या क्रमांकावर आहेत. या यादीत रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी ८३.६ अब्ज डॉलर्सच्या संपत्तीसह ११ व्या क्रमांकावर आहेत.


This is only an advertisement for information purposes and is not a prospectus announcement.

# S. V. J. ENTERPRISES LIMITED

(CIN: U15400MH2009PLC196514)

Our Company was originally incorporated on October 16, 2009 as a private limited company as "S. V. J. Enterprises Private Limited" under the provisions of the Companies Act, 1956 with the Registrar of Companies, Mumbai. Subsequently, pursuant to a special resolution of our Shareholders passed in the Extra Ordinary General Meeting held on June 01, 2022 our Company was converted from a private limited company to public limited company and consequently, the name of our Company was changed to 'S. V. J. Enterprises Limited' and a fresh certificate of incorporation consequent to conversion was issued on July 01, 2022 by the Registrar of Companies, Mumbai. The Corporate Identification Number of our Company is U15400MH2009PLC196514. For details pertaining to the changes of name of our company and change in the registered office, please refer to the chapter titled 'History and Certain Corporate Matters' beginning on page no. 99 of the Prospectus.

**Registered office:** 002, A-Wing, Sonam Palace CHS, Old Golden Nest Phase 1, New Golden Nest Road, Bhayander East, Thane 401105, Maharashtra, India;
**Tel. No.:** +91 9869057304 | **Email:** info@svjenterprises.co.in | **Website:** www.svjenterprises.co.in;
**Contact Person:** Ms. Saanvi Kargutkar, Managing Director

**OUR PROMOTERS: MR. SURESH JHA AND MS. VEENA JHA**

**THE ISSUE**

**INITIAL PUBLIC ISSUE OF 17,01,000 EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹10/- EACH ("EQUITY SHARES") OF S. V. J. ENTERPRISES LIMITED ("OUR COMPANY" OR "THE ISSUER COMPANY") FOR CASH AT A PRICE ₹36.00/- PER EQUITY SHARE (INCLUDING A SHARE PREMIUM OF ₹26.00/- PER EQUITY SHARE) ("ISSUE PRICE") AGGREGATING TO ₹ 612.36 LAKHS ("THE ISSUE"), OUT OF WHICH 87,000 EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹10/- EACH FOR A CASH PRICE OF ₹36.00/- PER EQUITY SHARE, AGGREGATING TO ₹31.32 LAKHS WILL BE RESERVED FOR SUBSCRIPTION BY MARKET MAKER ("MARKET MAKER RESERVATION PORTION"). THE ISSUE LESS THE MARKET MAKER RESERVATION PORTION I.E. ISSUE OF 16,14,000 EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹10/- EACH AT AN ISSUE PRICE OF ₹36.00/- PER EQUITY SHARE AGGREGATING TO ₹581.04 LAKHS (IS HEREINAFTER REFERRED TO AS THE "NET ISSUE"). THE ISSUE AND THE NET ISSUE WILL CONSTITUTE 30.53% AND 28.97%, RESPECTIVELY OF THE POST ISSUE PAID UP EQUITY SHARE CAPITAL OF OUR COMPANY. FOR FURTHER DETAILS, PLEASE REFER TO SECTION TITLED "TERMS OF THE ISSUE" BEGINNING ON PAGE NO. 176 OF THE PROSPECTUS.**

**ISSUE**
**OPENS ON: THURSDAY, FEBRUARY 23, 2023**
**CLOSES ON: TUESDAY, FEBRUARY 28, 2023**

**FIXED PRICE ISSUE AT ₹ 36.00 PER EQUITY SHARE**
**IS 3.6 TIMES OF THE FACE VALUE.**
**MINIMUM APPLICATION SIZE OF 3,000 EQUITY SHARES AND IN MULTIPLES OF 3,000 EQUITY SHARES THEREAFTER**

| | | | |
|---|---|---|---|
| ASBA* | Simple, Safe, Smart way of Application- Make use of it!!! | *Applications Supported by Blocked Amount (ASBA) is a better way of applying to issues by simply blocking the fund in the bank account, investors can avail the same. For details, check section on ASBA below. | Mandatory in Public Issues from January 01, 2016 No cheque will be accepted. |
| UPI UNIFIED PAYMENTS INTERFACE | UPI now available in ASBA for retail individual investors applying through Registered Brokers, DPs, & RTAs. Applicants to ensure PAN is updated in Bank Account being blocked by ASBA Bank. List of Banks supporting UPI is also available on SEBI at www.sebi.gov.in | | |

For details on the ASBA and UPI process, please refer to the details given in ASBA form and abridged prospectus and also please refer to the section **"Issue Procedure"** beginning on page 186 of the Prospectus. The process is also available on the website of SEBI and Stock Exchange in the General Information Document. ASBA forms can be downloaded from the website of BSE and can be obtained from the list of banks that is displayed on the website of SEBI at www.sebi.gov.in.

The Application Forms which do not have the details of the Applicant's depository account including DP ID, PAN, UPI ID (in case of RIBs using the UPI mechanism) and Beneficiary Account Number shall be treated as incomplete and rejected. In case DP ID, Client ID and PAN mentioned in the Application Form and entered into the electronic system of the stock exchange, do not match with the DP ID, Client ID and PAN available in the depository database, the application is liable to be rejected. Applicants will not have the option of getting allotment of the Equity Shares in physical form. The Equity Shares on allotment shall be traded only in the dematerialised segment of the Stock Exchange.

**PROPOSED LISTING:** The Equity Shares offered through the Prospectus are proposed to be listed on the SME Platform of BSE Limited ("BSE SME Platform") in terms of the Chapter IX of the SEBI (ICDR) Regulations, as amended from time to time. Our Company has received an In-principal approval letter dated January 06, 2023 from BSE Limited ("BSE") for using its name in the Offer Document for listing of our shares on the SME Platform of BSE Limited. However, investors may refer to the entire Disclaimer Clause of BSE beginning on page 170 of the Prospectus. For the purpose of this Issue, the Designated Stock Exchange will be the BSE Limited.

**DISCLAIMER CLAUSE OF SEBI:** Since the Issue is being made in terms of Chapter IX of the SEBI (ICDR) Regulations, 2018, the Prospectus was furnished to SEBI in soft copy. In terms of the SEBI Regulations, the SEBI shall not issue any observation on the Offer Document. Hence, there is no such specific disclaimer clause of SEBI. However, investors may refer to the entire Disclaimer Clause of SEBI beginning on page 167 of the Prospectus.

**DISCLAIMER CLAUSE OF BSE:** It is to be distinctly understood that the permission given by BSE Limited (BSE) should not in any way be deemed or construed that the contents of the Prospectus or the price at which the equity shares are offered has been cleared, solicited or approved by BSE, nor does it certify the correctness, accuracy or completeness of any of the contents of the Prospectus. The investors are advised to refer to page 170 of the Prospectus for the full text of the Disclaimer Clause pertaining to BSE".

| LEAD MANAGER TO THE ISSUE | REGISTRAR TO THE ISSUE | COMPANY SECRETARY AND COMPLIANCE OFFICER |
|---|---|---|
| **FIRST OVERSEAS CAPITAL LIMITED**<br>1-2 Bhupen Chambers, Ground Floor, Dalal Street, Mumbai-400 001<br>**Tel. No.:** +91 22 40509999 \| **Fax No.:** N.A.<br>**Email:** rushabh@focl.in /mala@focl.in<br>**Investor Grievance Email:** investorcomplaints@focl.in<br>**Website:** www.focl.in<br>**Contact Person:** Mr. Rushabh Shroff/ Ms. Mala Soneji<br>**SEBI Registration No.:** INM000003671 | **BIGSHARE SERVICES PRIVATE LIMITED**<br>Office No. S6-2, 6th Floor, Pinnacle Business Park, Mahakali Caves Road, Next to Ahura Centre, Andheri East, Mumbai – 400 093, Maharashtra, India<br>**Tel. No.:** +91 22 6263 8200<br>**Fax. No.:** +91 22 6263 8299<br>**Email:** ipo@bigshareonline.com<br>**Investor Grievance Email:** investor@bigshareonline.com<br>**Website:** www. bigshareonline.com<br>**SEBI Registration No.:** INR000001385<br>**Contact Person:** Babu Raphel C | **Ms. Akshita Agrawal**<br>**Registered Office:** 002, A-Wing, Sonam Palace CHS, Old Golden Nest Phase 1, New Golden Nest Road, Bhayander East, Thane 401105, Maharashtra, India.;<br>**Tel:** +91 9869057304<br>**Website:** www.svjenterprises.co.in<br>**E-mail:** info@svjenterprises.co.in;<br>Applicants can contact the Compliance Officer or the LM or the Registrar to the Issue in case of any Pre-Issue or Post-Issue related problems, such as non-receipt of Allotment Advice or credit of allotted Equity Shares in the respective beneficiary account or unblocking of funds etc. |

**BANKER TO THE ISSUE AND SPONSOR BANK:** AXIS BANK LIMITED

**AVAILABILITY OF APPLICATION FORMS:** The Application Forms and copies of the Prospectus may be obtained from the Registered Office of S. V. J. Enterprises Limited, Lead Manager: First Overseas Capital Limited. Application Forms will be available at the selected location of registered brokers, Banker to the Issue, RTA and Depository Participants. Application Forms can also be obtained from the Designated Branches of SCSBs, the list of which is available on the website of SEBI at www.sebi.gov.in. Application Forms can also be downloaded from the website of Stock Exchange at www.bseindia.com.

**AVAILABILITY OF PROSPECTUS:** Investors should note that investment in Equity Shares involves a high degree of risk and investors are advised to refer to the Prospectus and the Risk Factor contained therein, before applying in the Issue. Full copy of the Prospectus shall be available at the website of SEBI at www.sebi.gov.in the website of Stock Exchange at www.bseindia.com, the website of Lead Manager at www.focl.in and the website of the Issuer Company at www.svjenterprises.co.in.

**RISK TO INVESTORS:** Investments in equity and equity-related securities involve a degree of risk and investors should not invest any funds in this Issue unless they can afford to take the risk of losing their investment. Investors are advised to read the risk factors carefully before taking an investment decision in this Issue. For taking an investment decision, investors must rely on their own examination of the Issuer and this Issue, including the risks involved. The Equity Shares have not been recommended or approved by the Securities and Exchange Board of India ("SEBI"), nor does SEBI guarantee the accuracy or adequacy of the contents of the Prospectus. Specific attention of the investors is invited to the section, "Risk Factors" on page 22 of the Prospectus.

**PRECAUTIONARY NOTICE TO INVESTORS: Investors are advised to read the Prospectus including the risk factors carefully before taking an investment decision in this Issue. For taking an investment decision, investors must rely on their own examination of the Issuer and this Issue, including the risk factors page no. 22 involved. Specific attention of the investors is invited to THAT ANY News/Advertisements/ SMS/ Messages/ Articles and Videos, if any, being circulated in the digital media and/or print media, speculating about the investment opportunity in our Company's issue and about equity shares of our Company being available at premium and/or discount to the Issue price ("Message") during the issue period IS AND/ OR WILL NOT AND/ OR has not been issued by our Company or any of our Directors, Key Managerial Personnel, Promoters, Promoter Group or Group Companies. ANY SUCH MESSAGE IN circulation is misleading & fraudulent advertisement and issued by a third party to sabotage the IPO, our Company or any of our Directors, Key Managerial Personnel, Promoters, Promoter Group or Group Companies and the intermediaries are not involved in any manner whatsoever.**

**ADDITIONAL INFORMATION AS REQUIRED UNDER SECTION 30 OF THE COMPANIES ACT, 2013**

**Main Objects of the Company as per MOA:** For information on the main objects and other objects of our Company, see *"History and Certain Corporate Matters"* on page 99 of the Prospectus and Clause III of the Memorandum of Association of our Company. The Memorandum of Association of our Company is a material document for inspection in relation to the Issue. For further details, see the section *"Material Contracts and Documents for Inspection"* on page 239 of the Prospectus.

**Liability of Members as per MOA:** The Liability of the members of the Company is Limited.

**Capital Structure:** Authorized Capital of the Company is ₹1260.00 Lakhs consisting of 1,26,00,000 Equity Shares of ₹10 each. Pre-Issue Capital: Issued, Subscribed and Paid-up Capital ₹387.00 Lakhs consisting of 38,70,000 Equity Shares of ₹10 each. Post Issue Capital: Issued, Subscribed and Paid-up Capital ₹557.10 Lakhs consisting of 55,71,000 Equity Shares of ₹10 each. For details of the Capital Structure, please refer to the chapter titled *"Capital Structure"* beginning on page 52 of the Prospectus.

**Names of the signatories to the Memorandum of Association of the Company and the number of Equity Shares subscribed by them:** Given below are The names of the signatories of the Memorandum of Association of the Company and the number of Equity Shares subscribed for by them at the time of signing of the Memorandum of Association: Initial allotment to Mrs. Veena Jha (50,000 Equity Shares) And Mr. Suresh Jha (50,000 Equity Shares), being the subscribers to the MoA of our Company.

All capitalized terms used herein and not specifically defined shall have the same meaning as ascribed to them in the Prospectus dated February 10, 2023.

**Investors should read the Prospectus carefully, including the Risk Factors on page 22 of the Prospectus before making any investment decision.**

FOR **S. V. J. ENTERPRISES LIMITED**
**On behalf of the Board of Directors**
**Sd/-**
**Ms. Saanvi Kargutkar**
**Managing Director**

**Place :** Mumbai
**Date:** February 17, 2023

**S. V. J. ENTERPRISES LIMITED** is proposing, subject to market conditions, public issue of its Equity Shares and has filed the Prospectus with the Registrar of Companies, Mumbai. The Prospectus shall be available on the website of SEBI at www.sebi.gov.in, the website of the Lead Manager at www.focl.in the website of the BSE i.e. www.bseindia.com, and website of the Issuer Company at www.svjenterprises.co.in Investors should note that investment in Equity Shares involves a high degree of risk. For details investors should refer to and rely on the Prospectus including the section titled "Risk Factors" beginning on page 22 of the Prospectus, which has been filed with ROC.

The Equity Shares have not been and will not be registered under the US Securities Act (the "Securities Act") or any state securities law in United States and may not be Issued or sold within the United States or to, or for the account or benefit of, "U.S. persons" (as defined in the Regulations under the Securities Act), except pursuant to an exemption from, or in a transaction not subject to the registration requirements of the Securities Act of 1933.

Raka